धर्मेंद्र यांना सुपरस्टारचं बिरुद चिकटलं नाही; पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री फडणवीसांसह राज ठाकरेंनी जागवल्या आठवणी >> पान 2

मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'ॲग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनास भेट >> पान 4

**सुविचार**

विज्ञानात आत्मज्ञान आले तर सर्वोदय होईल.
– विनोबा भावे

दैनिक


# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 109 ■ मंगळवार, दि. 25 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



धर्मेंद्र यांनी २१ वर्षांपूर्वी लढवलेली निवडणूक, या मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराला पराभूत करून झालेले खासदार

आतील पान



# बॉलिवूडचा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड

## सुपरस्टार धर्मेंद्र यांच निधन, ८९ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा 'ही-मॅन' सुपरस्टार, हँडसम हंक धर्मेंद्र यांनी वयाच्या ८९व्या वर्षी अखेरचा श्र्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून प्रकृती अस्वास्थामुळे धर्मेंद्र यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते. तब्येत खालावल्यामुळे धर्मेंद्र यांना साधारणतः बारा दिवसांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. त्यानंतर धर्मेंद्र यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आलेला. तेव्हापासून ते घरीच होते. पण, अखेर त्यांच्या जुहूतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्र्वास घेतला. धर्मेंद्र यांच्या प्रकृती अस्वास्थापासूनच वेगवेगळ्या बातम्या माध्यमांमध्ये पसरत होत्या. अनेक अफवाही पसरलेल्या. अद्याप देओल कुटुंबीयांनी धर्मेंद्र यांच्या मृत्यूबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. पण, मिळालेल्या माहितीनुसार, धर्मेंद्र यांच्यावर अंत्यसंस्कारही करण्यात आलेत.

तब्बल सहा दशकं सिनेसृष्टीवर राज्य करणारा कोहिनूर हरपल्यानं मोठी पोकळी निर्माण झाली आहे. धर्मेंद्र यांच्या निधनानं अख्खं बॉलिवूड शोकसागरात बुडालं आहे.

**सर्वसामान्य कुटुंबातून आलेला मुलगा इंडस्ट्रीचा 'ही-मॅन' बनला**

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी ब्रिटिश भारतातील पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील नसराली या गावी झाला. आपल्यापैकी अनेकांना ठाऊक नसेल की, त्यांचं खरं नाव केवल कृष्ण देओल होतं. पण, सिनेसृष्टीत त्यांची ओळख धर्मेंद्र अशीच होती. त्यांचा जन्म एका सर्वसामान्य पंजाबी जाट कुटुंबात झालेला. धर्मेंद्र यांचं वडिलोपार्जित गाव लुधियानातील पखोवाल तहसीलमधील रायकोटजवळील डांगो आहे. धर्मेंद्र यांनी त्यांचं सुरुवातीचं आयुष्य सहनेवाल गावात घालवलं आणि लुधियानातील लालटन कलान येथील सरकारी वरिष्ठ माध्यमिक शाळेत शिक्षण घेतलेलं. त्यांचे वडील गावातील शाळेचे मुख्याध्यापक होते.

**प्रकृती अस्वास्थामुळे बरेच दिवसांपासून प्रकृती होती नाजूक**

ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते धर्मेंद्र यांना प्रकृती अचानक बिघडल्यामुळे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. त्यानंतर तब्बल १२ दिवस त्यांच्यावर उपचार सुरू होते. सरुवातीला उपचारांना ते प्रतिसाद देत होते. पण, नंतर त्यांची प्रकृती काहीशी नाजूक होती. त्यामुळे त्यांना खउण मधून व्हेंटिलेटरवर शिफ्ट करण्यात आलेलं. त्यानंतर पुन्हा त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झालेली, धर्मेंद्र उपचारांना प्रतिसाद देत, असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनानं दिलेली. तसेच, देओल कुटुंबीयांनीही, धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती दिलेली. त्यानंतर धर्मेंद्र यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आलेला. तेव्हापासून ते घरीच होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

धर्मेंद्र यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान, शाहरुख खान, गोविंदा, आमिषा पटेल, रितेश देशमुख यांसारख्या स्टार्सनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतलेली. धर्मेंद्र यांची भेट घेऊन निघालेल्या सर्वच स्टार्सच्या डोळ्यांत अश्रू तराळलेले. >> पान २

## अयोध्येतील राम मंदिरात पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज धर्मध्वजारोहण; रामनगरी उत्साहात मग्न



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रभू श्रीराम तब्बल ५०० वर्षांनंतर अयोध्येत भव्य-दिव्य अशा राम मंदिरात विराजमान झाले आहेत. २२ जानेवारी २०२४ रोजी पुण्यपावन देवभूमी अर्थात अयोध्यानगरीत डोळ्यांचं पारण फेडेल असा प्राणप्रतिष्ठेचा सोहळा पार पडला. जगभरातील लाखो भविकांनी याचि देही, याचि डोळा हा अमृतसोहळा पाहिला. प्रभू श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाल्यानंतर आज (२५ नोव्हेंबर २०२५ रोजी) श्री राम मंदिरात होणाऱ्या ध्वजारोहण समारंभासाठी अयोध्या नगरी पुन्हा एकदा सज्ज झाली आहे. अशातच आता आपण राम मंदिराबाबत काही खास गोष्टी जाणून घेऊया.

राम मंदिराचं वैशिष्ट्य काय?

–राम मंदिर पारंपरिक नागर शैलीत बनवलं गेले आहे.

– मंदिराची लांबी (पूर्व ते पश्चिम) ३८० फूट, रूंदी २५० फूट आणि उंची १६१ फूट आहे.

–मंदिर तीन मजली आहे. प्रत्येक मजल्याची उंची २० फूट असेल. मंदिरात एकूण ३९२ खांब आणि ४४ दरवाजे असतील

मुख्य गाभाऱ्यात प्रभु श्रीरामाचं बालरुप मूर्ती असेल. तर, पहिल्या मजल्यावर श्रीरामाचा दरबार आहे.

– मंदिरात ५ मंडप असतील. नृत्य मंडप, रंग मंडप, सभा मंडप, प्रार्थना मंडप आणि किर्तन मंडप आहेत.

– खांब आणि भिंतींवर कोरलेल्या देवी-देवतांच्या मूर्ती असणार आहेत.

–सिंहद्वारापासून ३२ पायऱ्या चढून पूर्व दिशेकडून मंदिरात प्रवेश करता येतो

– मंदिराच्या चारही बाजूंना आयातकार तटबंदी परकोटा आहे. चारही दिशांना याची एकूण लांबी ७३२ मीटर आणि रुंदी १४ फूट आहे.

>> पान २

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात कोल्हापूर पोलिसांची कारवाई

## मुख्य सूत्रधारासह १८ जणांना बेड्या; राज्यभर व्याप्ती वाढण्याची शक्यता

**मुंबई : राज्यभरात शनिवारी पार पडलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यात पेपरफुटीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. कागल तालुक्यातील मुरगुड पोलिसांनी केलेल्या कारवाईत पाच शिक्षकांसह एकूण १८ जणांना अटक करण्यात आली असून या टोळीचा मुख्य सूत्रधार महेश गायकवाड यालाही पोलिसांनी जेरबंद केले आहे.**




या प्रकरणी मुरगुड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. टीईटी परीक्षा राज्यातील शिक्षक भरतीसाठी पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जाते. मात्र, हीच परीक्षा फोडून लाखो रुपयांची कमाई करणारी टोळी कोल्हापूरमध्ये सक्रिय असल्याचे उघड झाल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी कागल तालुक्यातील सोनगे येथील एका फर्निचर मॉलवर छापा टाकला. येथे टीईटी परीक्षेचा छायांकित पेपर विद्यार्थ्यांना तीन लाख रुपयांना विकला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कारवाईदरम्यान सुरुवातीला नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले. पुढील तपासात या रॅकेटचा व्याप वाढत जाऊन अटक केलेल्यांची संख्या १८ वर पोहोचली. अटक केलेल्यांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील पाच शिक्षकांचाही समावेश असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. त्यामुळे शिक्षण विभागानेही संबंधित शिक्षकांची माहिती मागवून पुढील कारवाईची तयारी सुरू केली आहे.

राज्यात लाखो उमेदवार शनिवारी टीईटी परीक्षा देत होते. अनेक परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत सुरू असताना कोल्हापूरमध्ये मात्र पेपर फुटवण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती मिळताच शिक्षण विभागासह पोलिस यंत्रणा अलर्ट झाली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी काही परीक्षार्थी शिक्षक असून त्यांचा या रॅकेटशी संबंध असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. आरोपी सर्वजण कागल आणि राधानगरी तालुक्यातील असून आणखी काही संशयितांची नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मुरगुड पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने रात्रभर तपास सुरू ठेवला असून रॅकेटची व्याप्ती राज्यभर पसरली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पोलिसांनी सांगितले आहे.

## संतापजनक! बीडमध्ये ५ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार, आईवर ग्रामस्थांचा दबाव; अखेर गुन्हा दाखल


**बीड/प्रतिनिधी :** मालेगावच्या डोंगराळे येथील घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून सर्वत्र संतापाची भावना आहे. ३ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्दयीपणे हत्या केल्याची घटना ताजी असतानाच आता बीडमध्ये एका साडेपाच वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार झाला आहे. विशेष म्हणजे नात्यातीलच मुलाने अत्याचार केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. तर, धक्कादायक बाब म्हणजे गावातील लोकांनी गुन्हा दाखल न होण्यासाठी मुलीच्या आईवर दबाव आणल्याचे देखील प्राथमिक तपासात समोर आलं आहे.

पीडित मुलीवर बीडच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. ११ नोव्हेंबर रोजी ही अत्याचाराची घटना घडल्यानंतर तब्बल चार दिवस मुलीला उपचारासाठी गावकऱ्यांनी जाऊ न दिल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. ग्रामस्थांनी बदनामी नको म्हणून चक्क बैठका देखील घेतल्याचे पुढे आले. मुलीच्या नात्यातील व्यक्तींना घटना समजल्यानंतर त्यांनी थेट पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना संपर्क केला. त्यानंतर शिरूर कासार पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला आहे. चार दिवस घरात वेदना असाह्य झाल्यानंतर अखेर मुलीच्या आईने उपचारासाठी बीड गाठले आणि सध्या पीडित चिमुरडीवर बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. >> पान २

# उद्धव आणि राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला लिहिले पत्र

## १० बाय१० च्या खोलीत ५० मतदार कसे; निवडणूक आयोगाच्या भेटीनंतर आदित्य ठाकरे संतापले

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सुरुवात झाली असून येत्या २ डिसेंबर रोजी मुंबई नगरपालिका निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. त्यानंतर, जानेवारी महिन्यात राज्यातील मुंबईसह सर्वच महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर मतदार याद्यातील घोळ आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करण्याची मागणी ठाकरे बंधूंनी केली आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट यांना पत्र दिले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग निहाय मतदारयादी विभाजनातील गंभीर त्रुटी व गोंधळ दूर करून निष्पक्ष आणि पारदर्शक



निवडणूकप्रक्रिया राबवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेच्या बाळा नांदगावकर यांनी राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन आपलं गाऱ्हाणं मांडलं. तर, राज ठाकरेंचं पत्रही आयोगाला दिलं आहे.

निवडणूक आयोगाची मतदार याद्यांमध्ये गोंधळ कायम ठेवण्याची, आणि ते कधीही न निस्तरता, ते गोंधळ अधिक गुंतागुतीचे कसे होतील या बाबतीतलं जे सातत्य आहे त्याचं अभिनंदन करावं का खेद व्यक्त करावा हेच कळत नाही. असो पण पुन्हा एकदा >> पान २

# बिटकॉईन क्रॅश, डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का

## तब्बल ९८०० कोटी रुपये स्वाहा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं मोठं नुकसान झालं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या संपत्तीत तब्बल ९८०० कोटी रुपयांची घसरण झाली आहे. ट्रम्प यांची नेटवर्थ १.१ अब्ज डॉलर्सनं घसरण झाली आहे. याचं प्रमुख कारण क्रिप्टोकरन्सी मार्केटमध्ये झालेली घसरण होय. प्रामुख्यानं बिटकॉईन क्रॅश झाल्यानं ट्रम्प यांना फटका बसला आहे.

फोर्ब्सच्या नव्या रिपोर्टनुसार डोनाल्ड ट्रम्प यांची संपत्ती ६.२ अब्ज डॉलर्स झाली आहे. जी यापूर्वी सप्टेंबर महिन्यात संपत्ती ७.३ अब्ज डॉलर्स होती. म्हणजेच ट्रम्प यांच्या संपत्तीत १.१ अब्ज डॉलर्सची घसरण झाली आहे. रिपोर्टनुसार ट्रम्प यांची कंपनी टीएमटीजीच्या सेअरमध्ये घसरण झाली आहे. ही कंपनी डीजेटी टिकरनुसार व्यवसाय करते.

गेल्या शुक्रवारी बिटकॉईनसह इतर क्रिप्टोकरन्सीमध्ये मोठी घसरण झाली आहे. त्यामुळं टीएमटीजी स्टॉकमध्ये १०.१८ डॉलर्सची घसरण झाली. ट्रम्प यांच्या कंपनीच्या शेअरमध्ये काही दिवस घसरण होत आहे. ट्रम्प मीडिया अँड टेक्नोलॉजी ग्रुपचे सेअर गेल्या एक महिन्यात ३५ टक्क्यांनी तर



सहा महिन्यात ५५ टक्क्यांनी घसरले आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या संपत्तीत सप्टेंबर २०२५ पर्यंत मोठी वाढ पाहायला मिळत होती. गेल्या वर्षाच्या तुलनेत ३ अब्ज डॉलर्सची वाढ झाली होती. त्यामुळ डोनाल्ड ट्रम्प फोर्ब्सच्या अमेरिकेतील ४०० श्रीमंत लोकांच्या यादीत पोहोचले होते. ट्रम्प यांनी २०१ क्रमांक मिळाला होता. आता ट्रम्प यांच्या संपत्तीत १.१ अब्ज डॉलर्सची घसरण झाली आहे.

रिपोर्टनुसार ट्रम्प यांच्या संपत्तीतील वाढीचं कारण त्यांच्या कुटुंबानं क्रिप्टोमध्ये केलेली गुंतवणूक हे होतं. फोर्ब्सनुसार ट्रम्प आणि त्यांची तीन >> पान २



## महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा आज स्मृतिदिन. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए – एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# धर्मेंद्र यांना सुपरस्टारचं बिरुद चिकटलं नाही; पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री फडणवीसांसह राज ठाकरेंनी जागवल्या आठवणी

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचे ही मॅन आणि ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्र्वास घेतला. गेल्या अनेक दिवसांपासून प्रकृती अस्वास्थामुळे ते रुग्णालयात दाखल होते, त्यानंतर त्यांच्यावर राहत्या घरी उपचार सुरू होते. अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली. धर्मेंद्र यांच्या निधनाबाबत देओल कुटुंबीयांकडून माध्यमांना अधिकृत माहिती देण्यात आली नाही. पण, अवघ्या अर्ध्या तासांतच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मुलगा सनी देओलने त्यांच्या पार्थिवास मुखाग्नी दिला. त्यानंतर, देशभरातून धर्मेंद्र यांच्या आठवणी जागवल्या जात आहेत. पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री यांच्यासह दिग्गज नेते धर्मेंद्र यांच्या योगदानाचे वर्णन करत आठवणी जागवत आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही धर्मेंद्र यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले.

**राज ठाकरेंकडून शोक, जागवल्या आठवणी**

ज्येष्ठ अभिनेते धर्मेन्द्रजींचं निधन झालं. भारतीय सिनेमात 'सुपरस्टार' म्हणलं की त्याच्या झंझावाताचा एक काळ असतो आणि तो ओसरण्याचा पण एक काळ असतो. पण याला अपवाद म्हणजे धर्मेंद्रजी. एकापेक्षा एक सुपरहिट सिनेमे दिले, पण सुपरस्टारचं बिरुद त्यांना चिकटलं नाही म्हणा किंवा त्यांनी चिकटू दिलं नाही. मला चिकटू दिलं नाही असंच जास्त वाटतं, कारण धर्मेन्द्रजींच्या बाबतीत त्यांचं प्रतिमेहून प्रत्यक्ष उत्कट असं होतं. १९६० च्या दशकात धर्मेंद्र नावाचा एक देखणा, शरीराने अतिशय सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा सहज जाणवत असला तरी त्यात कुठेही दांडगाई नाही, अशा एका व्यक्तिमत्वाचा एक तरुण पडद्यावर झळकला आणि पुढे कित्येक दशकं त्याने हिंदी चित्रपटसृष्टीवर गारुड केलं.

**मुख्यमंत्र्यांकडून शोक संदेश**

भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा हि-मॅन म्हणून लौकीक मिळवेलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात की, ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचा हिंदी चित्रपट सृष्टीतला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण राहिला. कृष्ण- धवल काळ ते रंगीत आणि अलिकडच्या तांत्रिकदृष्ट्या आधुनिक प्रवाहात ते कार्यशील राहिले. ते चित्रपट सृष्टीतील बदलाचे, भरभराटीपासून ते आतापर्यंतच्या काळाचे महत्वाचे साक्षीदार राहिले. नायक म्हणून तरूण वयात सालस, स्वप्नाळू नायक ते विविध चित्रपटात वाट्याला आलेल्या भूमिका त्यांनी अभिनयाने आयकॉनिक ठरवल्या. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत. मध्यंतरी त्यांनी लोकसभेत भारतीय जनता पक्षाचे खासदार म्हणून बिकानेरचे प्रतिनिधीत्व केले होते. पण त्यांनी चित्रपटसृष्टी आणि अभिनय, या क्षेत्रातील प्रयोगशीलता यांनाच अधिक प्राधान्य दिले. सुमारे तीनशेहून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या. एकाच वर्षांत ९ हिट चित्रपट देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले. त्यांच्या निधनाने आपल्या चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला आहे.

**उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून शोक**

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका तेजस्वी पर्वाचा अंत झाला असून, अभिनयाचा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, धर्मेंद्र यांच्या अभिनयात नैसर्गिकता, साधेपणा आणि मनाला भिडणारी भावनिक ताकद होती. 'शोले', 'चुपके चुपके', 'अनुपमा', 'सत्यकाम', 'दिललगी' अशा अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहेत. विशेषतः 'शोले'मधील त्यांनी साकारलेली 'वीरू'ची भूमिका रसिकांच्या मनात अजरामर आहे. धर्मेंद्र यांचा चित्रपट प्रवास म्हणजे मेहनत, समर्पण आणि कलाविश्र्वाप्रती असलेल्या निःस्वार्थ प्रेमाचे प्रतीक आहे. त्यांनी अनेक पिढ्यांतील प्रेक्षकांना आपल्या अभिनयातून निखळ आनंद दिला. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपट सृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कुटूंबियांना, चाहत्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

पान १ वरून...

## बॉलिवूडचा 'ही-मॅन'

**'विजयता फिल्म्स' प्रोडक्शन हाऊस उभारलं**

१९८१ मध्ये, प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र यांनी चित्रपट उद्योगात आपले पाय अधिक मजबूत करण्यासाठी 'विजयता फिल्म्स' हे त्यांचं प्रोडक्शन हाऊस सुरू केलं. 'विजयता फिल्म्स'च्या माध्यमातून, धर्मेंद्र यांनी सर्वात आधी त्यांची दोन्ही मुलं, सनी देओल आणि बॉबी देओल यांना बॉलिवूडमध्ये आणलं. यानंतर धर्मेंद्र यांनी त्यांच्या कुटुंबातील पुढच्या पिढीला चित्रपटांमध्ये संधी दिली, त्यांचा नातू करण देओल याची प्रेक्षकांना ओळख करून दिली.

धर्मेंद्र यांनी आपल्या सहा दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत 'शोले', 'चुपके चुपके', 'सत्यकाम', 'सीता और गीता' यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांत काम केलं. जरी त्यांनी जगाला अखेरचा अलविदा म्हटलं असलं, तरीसुद्धा ते आज, उद्या आणि कायम प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवतील.

## अयोध्येतील राम मंदिरात पंतप्रधान

– तटबंदीच्या चारही कोनांना सूर्यदेव, आई भगवती, गणपती, भगवान शिव यांची मंदिरं तर उत्तरेला अन्नपूर्णेचे आणि दक्षिणेला हनुमानाचं मंदिर आहे.

– मंदिराजवळ पौराणिक सीताकूप आहे. ही एक विहीर आहे, याच विहिरीतून आजही थोडं पाणी श्रीराम यांच्या रोजच्या नैवेद्यासाठी वापरलं जातं

– इथे सप्तर्षी मंदिरांची निर्मिती केली गेली आहे. ज्यात महर्षि वाल्मिकी, महर्षि वशिष्ठ, महर्षि विश्र्वामित्र, महर्षि अगस्त्य, निषादराज, माता शबरी आणि ऋषिपत्नी देवी अहिल्या यांचा समावेश आहे.

–दक्षिण-पश्र्चिम भागातील नवरत्न कुबेर टिळ्यावरील भगवान शिवाच्या प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार करून तेथे जटायूची मूर्ती बसवण्यात आली आहे, सोबतच राम सेतूच्या उभारणीत आपला वाटा देणाऱ्या खारु ताईची मूर्तीही पाहायला मिळते.

– मंदिरात लोखंडाचा अथवा स्टील चा वापर केला गेलेला नाही. जमिनीवर काँक्रीटीकरणही करण्यात आलेलं नाही.

– मंदिराच्या खाली १४ मीटर जाडीचा रोलर कॉम्पॅक्टेड काँक्रीट (ठउउ) टाकण्यात आला आहे. त्याला कृत्रिम खडकाचे स्वरूप देण्यात आले आहे.

– मातीच्या ओलाव्यापासून मंदिराचे रक्षण करण्यासाठी ग्रॅनाईटचा २१ फूट उंच मंडप तयार करण्यात आला आहे.

–मंदिर संकुलात सीवर ट्रीटमेंट प्लांट, वॉटर ट्रीटमेंट प्लांट, अग्निशमनासाठी पाण्याची व्यवस्था आणि स्वतंत्र पॉवर स्टेशन स्वतंत्रपणे बांधण्यात आले आहे.

–मंदिराचं बांधकाम नागर शैली मध्ये केलं गेलं आहे.

– चंद्रकांत सोमपुरा यांनी या मंदिराचं डिजाईन तयार केलं आहे.

अयोध्येतील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बदल

अयोध्येतील श्री राम मंदिरात २५ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या ध्वजारोहण समारंभाच्या तयारीसाठी शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बदलली जात आहे. या गर्दीच्या लग्नाच्या हंगामात, अयोध्येला जाणाऱ्यांनी त्यांचे मार्ग आधीच तपासावेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की २४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजल्यापासून पौष महिन्याच्या अखेरीपर्यंत, अनेक भागात अत्यावश्यक सेवा देणाऱ्या आणि पास असलेल्या वाहनांशिवाय सर्व वाहनांवर कडक निर्बंध लादले जातील.

## संतापजनक! बीडमध्ये ५ वर्षीय

पीडित मुलीच्या नात्यातीलच एका नराधमाने हे कुकर्म केल्यामुळे बदनामी नको म्हणून पीडित कुटुंबालाच गावकऱ्याकडून धमकी देण्यात येत होती. या संपूर्ण संतापजनक घटनेची आपबीती सांगत असताना पीडित मुलीच्या आईला अश्रू अनावर झाले. दरम्यान, पोस्कोमधला गुन्हा तात्काळ नोंदवून घेतला पाहिजे गुन्हा नोंद करून घेण्यास दिरंगाई करणे हा देखील गुन्हाच आहे. त्यामुळे शिरूर कासार पोलिसांवर देखील या प्रकरणात कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी बालकल्याण समितीचे सदस्य तत्वशील कांबळे यांनी केली आहे. तसेच, नातेवाईकांकडून आणि गावकऱ्यांकडून गुन्हा न दाखल होण्यासाठी दबाव होता, पण मुलीची आई मॅनेज झाली नाही. आईने गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर, याप्रकरणी गुन्हा नोंद झाला आहे. मात्र, ९० टक्के प्रकरणात दबाव टाकून पोलीस स्टेशनपर्यंत येऊच दिले जात नसल्याचेही कांबळे यांनी सांगितले.

## उद्धव आणि राज ठाकरे यांनी

निवडणूक आयोगाने मतदार यादीशी संबंधित घोळ तसाच ठेवला हे परत सिद्ध झालं. कसं ते सांगतो... असे म्हणत मतदार यादीतील घोळाची माहितीच राज ठाकरेंनी आपल्या पत्रातून निवडणूक आयोगाला दिली आहे.

राज ठाकरेंनी दाखवलेल्या चुका

१) निवडणूक आयोगाने शेवटची मतदार यादी ही ३०/१०/२०२४ रोजी प्रकाशित केली. त्यानंतर नवीन यादी प्रकाशित झाली नाही.

निवडणूक आयोगाच्याच नियमाप्रमाणे दर वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात नवीन यादी प्रसिद्ध होते आणि त्यानंतर दर तीन महिन्याला सुधारित यादी प्रसिद्ध होते. या वर्षात असं काही झालंच नाही. का? हे हेतुपुरस्सर होतं असं म्हणलं तर निवडणूक आयोगाला लगेच राग येतो. पणजर ते हेतुपुरस्सर नसेल तर मग कारण काय ?

२) बरं तुम्ही तुमच्या संकेतस्थळावर नवीन मतदार नोंदणी, वगळली गेलेली नावं आणि बदल यासह जे प्रसिद्ध केलं आहेत ती फक्त औपचारिकता म्हणून केलं आहेत असं म्हणायला पूर्ण वाव आहे कारण इतका त्याच्यात गोंधळ आहे. कारण नवीन सुधारित यादीत ते कोण आहेत स्त्री का पुरुष ? त्यांचा पत्ता काय ? याचा कोणताही तपशील नाही. बरं जेंव्हा सर्वपक्षीय नेत्यांचं शिष्टमंडळ मा. श्री. चोकलिंगम यांना भेटलं होतं तेंव्हा त्यांनी कुठल्याही त्रुटींशिवाय आम्ही याद्या प्रसिद्ध करू आणि तुम्ही दिलेल्या सूचनांचं पालन करू असे सांगितलं मग त्याचं काय झालं?

३) महापालिका निवडणुकांसाठी आधी मतदार याद्या प्रसिद्ध करण्याची तारीख ६ नोव्हेंबर २०२५ ठरली होती आणि ती पुढे ढकलत २० नोव्हेंबरला निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केली. मुळात तुम्ही गेले १३ महिने मतदार याद्याच प्रसिद्ध केल्या नाहीत, त्यात जी यादी जी आगामी महापालिका निवडणुकांसाठी सगळ्यात महत्वाची आहे ती प्रसिद्ध करून त्यावर हरकती घ्यायला ८ दिवस दिलेत.. हे काय आहे? मुळात तुम्ही प्रसिद्ध केलेल्या याद्या सदोष. त्यात धड कोणती माहिती नाही. बरं राजकीय कार्यकत्यांना त्यावर काम करायचं असेल तर तुम्ही ज्या याद्या प्रसिद्ध केल्यात त्या फक्त वाचण्यास योग्य. मग त्यावर काम करायचं तर त्याच्यावर काही तांत्रिक संस्कार करा त्यालाच काही दिवस लागतात. मुळात या याद्या एडिटेबल फॉरमॅट मध्ये का नाहीत? जग 'कृत्रिम बुद्धिमत्तेकडे' निघालेलं असताना, निवडणूक आयोगाच्या कारभारात तांत्रिक विषयांतील 'जनरल बुद्धिमत्ता' पण दिसत नाही. असो.

४) बरं, या याद्यांवर अभ्यास करून आक्षेप नोंदवायचे तर त्याची प्रक्रिया पण तुम्ही किचकट करून ठेवली आहेत. अनेक ठिकाणी एका वॉर्डमधले मतदार दुसऱ्या वॉर्डमध्ये टाकलेत. अनेक इमारती तुम्ही आखून दिलेल्या नकाशाच्या आता मतदार पण पळवायला सुरुवात झाली आहे का ? पलीकडे आहेत, तरीही त्या वॉर्डमध्ये दिसत आहेत. सध्या सत्ताधारी पक्ष उमेदवार पळवत आहेत, त्यातून प्रेरणा घेऊन

५) याद्यांवर काम करून आक्षेप नोंदवताना, आक्षेप घेणाऱ्यानेच त्या मतदाराचा आधारकार्ड किंवा इतरं पुरावा मागितला आहे. हे म्हणजे चुका तुम्ही करायच्या आणि त्या आम्ही दाखवल्या की तुम्ही आमच्याकडे किंवा मतदाराकडे पुरावे मागायचे. वा ! बरं ज्या दुबार मतदारांच्या विषयासाठी आम्ही निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना भेटत होतो, आणि दुबार नाहीतच असा निवडणूक आयोग तेंव्हा करत होता. त्याच निवडणूक आयोगाने मान्य केलं की जवळपास १० लाख दुबार मतदार आहेत. मग जर इतके मतदार दुबार आहेत त्यांना शोधून, त्यांची नावं वगळण्यासाठी ७ ते ८ दिवस कसे पुरतील? त्यासाठी किमान २१ दिवस हवेत. आक्षेप घेण्यासाठी कोणत्याही राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यास एकत्रित आक्षेप घेण्याची मुभा असली पाहिजे.

६) एकतर निवडणूक आयोगाने २१ दिवस द्यावेत किंवा निवडणूक रद्द करावी. आणि पुन्हा सर्व याद्या सुरळीत करून निवडणुका घ्याव्यात. तुम्ही ५ डिसेंबर २०२५ ला एक यादी प्रसिद्ध कराल आणि नियमाप्रमाणे आम्ही सगळं केले असं सांगून स्वतःच समाधान कराल. पण महाराष्ट्रातील जनतेला हे माहित आहे की तुम्ही अजिबात तुमच्या कामाबाबत प्रामाणिक नाही आहात. तुम्ही स्वतःला स्वायत्त यंत्रणा म्हणवता, मग तुमची स्वायत्तता दाखवाच. एक गोष्ट विसरू नका, तुम्ही पण या राज्याचे नागरिक आहात...

आज कोणाच्यातरी मागे घरंगळत जाताना तुम्हाला छान वाटेल... पण ज्यांच्यामागे तुम्ही घरंगळत जात आहात, ती लोकं उद्या तुमच्या नरडीला नख लावतील तेंव्हा तुम्हाला कळेल. तुमच्यात सद्सदविवेक बुद्धी आहे असं आम्ही मानतो, तिचा मान राखा. तुमचा पाठीचा कणा ताठ ठेऊन तुमची स्वायत्तेतून येणारी शक्ती काय असते ही सत्ताधाऱ्यांना दाखवा. महाराष्ट्राची जनता तुमची शतशः ऋणी राहील.

निवडणूक आयोगाच्या भेटीनंतर काय म्हणाले आदित्य ठाकरे

आम्ही नुकतीच राज्य निवडणूक आयोगाला भेटून आलो, त्यांना उद्धव ठाकरे, राज ठाकरेंचं पत्रही दिलेलं आहे. निवडणुका आज होतील, उद्या होतील अजूनही काहीही नाही. हे सरकार वोट चोरून सर्व करत आहे, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. मुंबई महापालिकेसाठी वॉर्ड बाऊंडरी जाहिर झाली. प्रारूप मतदार यादी ७ तारखेला येणार होती, ती १४ ला येणार सांगितलं, मग २० ला ती आली. भाजप सोडून सर्व विरोधी पक्षांनी यादी वाचन सुरू केलं आहे. जात-धर्म पाहून याद्या बदलून आलेल्या आहेत. सगळ्या वार्डात हे केलेलं नाही तर फक्त विरोधी पक्ष नेत्यांच्या यादीत हे केलेलं आहे, हा देशद्रोहाचा गुन्हा आहे. पारदर्शक निवडणूका म्हणता मग हे का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी विचारला.

## बिटकॉईन क्रॅश,

मुलं वर्ल्ड लिबर्टी फायनान्शिअलचे सह संस्थापक म्हणून लिस्ट करण्यात आलं होतं. या विकेंद्रीत फायनान्शिअल प्लॅटफॉर्मला सप्टेंबर २०२४ मध्ये लाँच करण्यात आलं होतं. कंपनीनं १०० अब्ज डॉलर्सचे डब्ल्यूएलएफआय टोकन बनवले होते त्यापैकी २२.५ अब्ज टोकन डीटी मार्क्स डीईएफआई एलएलसीला देण्यात आले होते. या कंपनीत ट्रम्प यांची जवळपास ७० टक्के भागिदारी होती. डब्ल्यूएलएफआय टोकन लाँच झालं तेव्हा त्याचं मूल्य ०.३१ डॉलर्स होतं ते आता ०.१५८ डॉलर्सवर आलं आहे.

नोव्हेंबर महिन्यातील सुरुवातीला सिक्यूरिटीज अँड एक्सचेंज कमिशनकडे टीएमटीजीनं केलेल्या फायलिंग नुसार तिसऱ्या तिमाहीत त्यांचं नुकसान ५४.८ मिलियन डॉलर्स इतकं होतं. कंपनीच्या बिटकॉईन होल्डिंग्जमध्ये ४८ मिलियन डॉलर्सची घसरण झाली आहे.

बिटकॉईनच्या किमती मोठ्या प्रमाणावर घसरल्या आहेत.६ ऑक्टोबरला एका बिटकॉईनची किंमत १२५००० अमेरिकन डॉलर इतकी होती. त्यात ३० टक्क्यांची घसरण होऊन ते ८६१७४ डॉलरवर आली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आयआयएमयूएन आयोजित 'युथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचा संवाद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत.

मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेस वे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णत: बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. 'मुंबई वन' हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्यूशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु, वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळापेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

लोकशाही अधिक सक्षम आणि सर्व समावेशक करण्यासाठी युवांचा सहभाग अत्यावश्यक आहे. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वतःचे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा १०० टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत १०० टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. त्याचबरोबर धारावीच्या पुनर्विकासात ३० टक्के क्षेत्र पूर्णपणे अनडेव्हलपेबल ठेवले जाणार असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात ओपन आणि ग्रीन स्पेसेस निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## स्मृतीच्या वडिलांना सौम्य अटॅक, बीपी वाढला पण सध्या प्रकृती स्थिर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधनाच्या वडिलांची तब्येत सध्या स्थिर असल्याची माहिती समोर आली आहे. स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांचा बीपी वाढला होता आणि सौम्य हृदयविकाराचा झटका आल्याचे दिसून आले. त्यामुळे स्मृती आणि पलाश मुच्छलचे आज होणारे लग्नही पुढे ढकलण्यात आले. स्मृतीच्या वडिलांवर सांगलीतील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून एक ते दोन दिवस त्यांना देखरेखीखाली ठेवण्यात येणार आहे.

स्मृती मानधना आणि पलाश मुच्छलचा रविवारी सांगलीत शाही विवाहसोहळा पार पडणार होता. मात्र विवाहाआधी स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांची तब्येत बिघडली. शारीरिक तणावामुळे त्यांना सौम्य हृदयविकाराचा झटका आल्याचं डॉक्टरांनी सांगितले.

अँजिओग्राफी करावी लागण्याची शक्यता

स्मृतीच्या वडिलांना उपचारासाठी सांगलीतील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उपचार सुरू असताना त्यांचा बीपीही वाढला होता. त्यामुळे श्रीनिवास मानधना यांच्यावर आता अंजिओग्राफी करावी लागू शकते असे डॉ. नमन शाह यांनी सांगितले. श्रीनिवास मानधना यांना या आधी कोणतेही आजार नव्हते.

## निवडणुकीसाठी १० लाख घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ, महिलेचं टोकाचं पाऊल

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वातावरण तापलं असताना, दुसरीकडे मंत्री पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहायकाच्या पत्नीने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. मुंबईतील ही घटना ताजी असतानाच आता कोल्हापुरात एका विवाहित महिलेला निवडणूक खर्चासाठी माहेराहून तब्बल १० लाख रुपये घेऊन येण्याची मागणी करत तिचा छळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेनं राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणूक खर्चासाठी माहेरकडून दहा लाख घेऊन येण्याचा तगादा लावल्याने विवाहित महिलेने आत्महत्या केल्याची धक्कादाय घटना घडली.

कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथील विवाहित महिलेनं सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या आर्थिक आणि मानसिक त्रासातून टोकाचं पाऊल उचललं. कौसर गरगरे असं आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी कौसर यांचा भाऊ अल्ताफ आवटी यांनी कुरुंदवाड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी कौसर यांचा पती, सासू-सासऱ्यासह जावेच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. कौसर यांचा सासरा राजमहंदर गरगरे कुरुंदवाड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून आहे. त्यामुळे निवडणुकीत खर्च करण्यासाठी माहेराहून १० लाख घेऊन येण्याची मागणी विवाहितेकडे केली जात होती. त्यासाठी, सासरच्या मंडळींकडून कौसर यांचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. त्यामुळे, गुरुवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास कौसर यांनी घराच्या छताला गळफास घेऊन स्वतःचं आयुष्य संपवल्याचा धक्कादायक प्रकार घडला. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी तात्काळ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे. मात्र, ऐन निवडणुकीच्या काळात अशा पद्धतीने विवाहित महिलेला देण्यात आलेल्या त्रासामुळे राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे.

## एंजल वन ने गुंतवणूकदारांना फसवणूक करणारे सोशल मीडिया ग्रुप्स आणि अनधिकृत गुंतवणूक योजनांबाबत केले सतर्क

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** एंजल वन लिमिटेड या फिनटेक क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने गुंतवणूकदारांना एंजल वनच्या नावाचा गैरवापर करून आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे खोटे सांगत फसवणूक करणाऱ्या सोशल मीडिया ग्रुप्सबाबत सतर्क केले आहे.

कंपनीला व्हॉट्सॲप व टेलिग्राम अशा सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्म तयार करण्यात आलेले अनेक अनधिकृत ग्रुप्स निदर्शनास आले आहेत, जे एंजल वन लिमिटेडचे ब्रँड नाव व लोगोचा, तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांचा व प्रतिष्ठेचा बेकायदेशीर व फसवणूक करणाऱ्या पद्धतीने गैरवापर करत आहेत. एंजल वन ने ओळखले आहे की फसवणूक करणारे हे ग्रुप्स बेकायदेशीर कृती करत आहेत, जसे आवश्यक सेबी नोंदणी/परवानगीशिवाय सुरक्षिततेसंबंधित सल्ला किंवा शिफारशी देणे, तसेच सेबीच्या मान्यतेशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित परतावे व कामगिरीबाबत अनधिकृत दावे करणे.

''आम्ही सांगू इच्छितो की, सिक्युरिटीज बाजारपेठेत गुंतवणूकीबाबत अनधिकृत सल्ला देणे किंवा परताव्यांची हमी देणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. आम्ही गुंतवणूकदारांना आमच्या कंपनीकडून असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही संवादाची सत्यता बारकाईने पडताळून पाहण्याचे आवाहन करतो. सखोल संशोधन करत आणि अधिकृत स्रोतांकडून मिळालेल्या माहितीनुसार कायदेशीर गुंतवणूक करण्याचा निर्णय घ्यावा. एंजल वन लिमिटेडचा कोणतेही बनावट ॲप्लीकेशन्स, वेब लिंक्स किंवा खाजगी व्हॉट्सॲप/टेलिग्राम ग्रुप्ससोबत प्रत्यक्षरित्या किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा संबंध नाही आणि फसवणूक करणारे ॲप्लीकेशन्स किंवा वेब लिंक्ससोबत व्यवहार केल्याने होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानासाठी किंवा परिणामांसाठी जबाबदार नाही,'' असे एंजल वन ने सांगितले.

एंजल वनने स्पष्टपणे सांगितले की कंपनी अनधिकृत सोशल मीडिया ग्रुप्समध्ये ग्राहकांना सामील करत नाही, मेसेजिंग प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून संवेदनशील वैयक्तिक माहिती देण्याची विनंती करत नाही, अनधिकृत चॅनेल्सच्या माध्यमातून निधी मागत नाही किंवा हमीपूर्ण परताव्यांचे आश्वासन देत नाही. सर्व कायदेशीर व्यवहार फक्त एंजल वनच्या अधिकृत प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून केले पाहिजेत आणि अधिकृत स्रोतांमधून व अधिकृत ॲप स्टोअर्समधून ॲप्लीकेशन्स डाऊनलोड केले पाहिजेत. एंजल वन गुंतवणूकदारांच्या हितांचे संरक्षण करण्याप्रती आणि सुरक्षित ट्रेडिंग पद्धतींना चालना देण्याप्रती कटिबद्ध आहे. कंपनी सर्व गुंतवणूकदारांना सतर्क राहण्यचे आणि आर्थिक नुकसानापासून संरक्षणासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करते.

सर्वांना अशा कंपन्यांसोबत व्यवहार करण्यापासून दूर राहण्याचा आणि कायदा अंमलबजावणी संस्थांना त्वरित कोणत्याही संशयास्पद क्रियाकलापांची तक्रार करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तुमच्याबाबतीत कोणताही संभाव्य घोटाळा झाल्यास सायबरक्राइम पोर्टल cyber crime.gov.in च्या माध्यमातून किंवा हेल्पलाइन १९३० शी संपर्क साधत किंवा तुमच्या जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये जाऊन किंवा आम्हाला ceoescalation angelone.in येथे ईमेल करत संबंधित घोटाळ्याची तक्रार करू शकता.

## रिफ्लेक्टर नसलेल्या लोखंडी संरक्षक कठड्यांना धडकून भोगावनजिक मिनी बस दरीत कोसळली;२२ जखमी प्रवाशांपैकी १० प्रवासी गंभीर

पोलादपूर : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामाग क्रमांक ६६ वर रायगड जिल्ह्यातील पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोगाव बुद्रुक नजिक सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. स्वारगेट पुणे ते दापोलीपर्यंत जाणारी खासगी मिनी बस महामार्गावरील पुलाच्या अलिकडे रिफ्लेक्टर नसलेल्या लोखंडी संरक्षक कठड्यांना धडक देत लोखंडी कठड्यांसह अंदाजे ४५ ते ५० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात २२ प्रवाशी जखमी झाले असून त्यातील १० प्रवाशांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. गेल्या काही दिवसांपासून पोलादपूर ते खेड दरम्यानच्या भुयारी मार्गाकडे जाणाऱ्या महामार्गाचे काम सुरू असल्याने मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील एक लेन बंद ठेवण्यात आली आहे. पहाटे धुके असल्याने रिफ्लेक्टर नसलेले लोखंडी संरक्षक कठडे चालक सूरज गागनाथ अलकुंटे (वय २५, रा.कात्रज, पुणे, मूळ रा.अलकुंटे, जि.सोलापूर) याच्या नजरेस न पडल्याने या लोखंडी संरक्षक कठड्यांना श्रीसाई ट्रॅव्हल्सची मिनी बस (एमएच १२ वायबी २८३५)ची धडक बसताच लोखंडी कठडेदेखील कॉंक्रीटने जमिनीत ठासले नसल्याने लोखंडी कठड्यांसह मिनीबस थेट दरीकडे झेपावली. यावेळी बसमधील प्रवाशांच्या किंचाळण्यासह बसच्या धडकेमुळे लोखंडी कठड्यांचा कर्णकर्कश्य आवाज झाल्याने स्थानिक नागरिकांनी तात्काळ अपघातस्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले आणि मिनीबसमधील जखमींना महामार्गावर आणले.


## शब्दकोडे क्र. 17

आडवे शब्द

१. अत्यंत नीच, दुष्ट ४. मंत्रीमंडळ ७. बांगड्यांचा व्यवसाय करणारी एक जमात १०. बायको ११. झकास, छान १२. लाकूड कापण्याचे दातेरी हत्यार १४. एकूण एक सर्व १५. घटस्फोट १६. प्रतिष्ठा, समाजातील वजन १७. लोणी २०. मिंधा २२. लहान मुलगी, कुमारी २३. धनी, स्वामी २५. केळ्यांचा गुच्छ २६. अग्रलेख २८. नृत्यकलेचा देव ३०. बगळा ३२. जरचा जोडीदार ३३. देवाशी केलेला करार ३४. तालासुरात बांधलेले ३५. परमेश्वर ३७. वाणी ३९. मनाचा ओढा ४२. दुलई ४३. पत्त्यातील जोडपे ४४. मराठीत कोर्ट ४५. खून ४६. एक ज्वालाग्रही खनिज ४८. स्वयंप्रकाशी कीटक ४९. फुललेला, फुगीर ५१. जागणे, देवाच्या नावाने जागरण करणे ५२. वेल ५४. डोंगर ५६. दचकणे, घाबरणे ५८. मोठ्या मनाचा ५९. संधी, फुरसत ६०. असंख्य, पुष्कळ ६२. जन्म-मृत्यू ६४. जिवलग मित्र ६७. धमनी, रक्तवाहिनी ६८. रसाळ ६९. नमनीय ७२. कंटाळवाणी (बडबड) ७४. भात शिजतानाचा आवाज ७६. त्वरित, अचानक ७७. प्रत्येक दिवशी ७८. वाळवी, उणीव

उभे शब्द

१. फार मोठे २. योग्य, उचित ३. दहावी रास ४. नवऱ्याची दुसरी पत्नी ५. मिग्नन ६. प्रजा ७. पूर्ण बदल ८. प्रामाणिक, सज्जन ९. रत्न १०. विद्युल्लता १३. दागदागिने १५. पुष्कळ, अति १६. पळून जाणे १८. रंग १९. थेट, सरळ २१. जाणीव, लाज २२. शिल्लक राहिलेली रक्कम २३. मानलेली मुलगी २४. महाभयंकर २७. दार २९. विजयाचा नामघोष ३०. बांधलेला ३१. पं.भीमसेन जोशी यांचे गुरु ३६. जमीन मोजण्याची पट्टी ३८. गवत ४०. नाश पावणे (वा.प्र.) ४१. वडीलांची बहीण ४३. कणखर, ओबडधोबड ४५. पोलीस शिपाई ४७. आजूबाजूला ५०. वळू ५३. धातूचा धागा ५४. एक केशरी गराचे फळ ५५. मुलायम ५६. चविष्ट ५७. मागील अंगणाचा दरवाजा ५८. पार्वतीचे एक नाव ६१. फुलपाखराची प्रथमावस्था ६२. लोकांचा कल ६३. सामुदायिक रडणे ६५. पदार्थातील अतिमीठाची चव ६६. चरण ७०. रूचिहीन ७१. संधी ७३. दगडवरील घाव, पाणी साठवण्याचे साधन ७५. सडक,मार्ग



### शब्दकोडे क्र. 16 चे उत्तर

आडवे उत्तर

१.साष्टांग नमस्कार विनंती विशेष ९.हेवा ११.जलद १२.दीर १३.वारस १४.दादरा १६.नमुना १८.सटवाई २०.रडी २१.बाका २२.अलवार २३.कटकट २५.वरूण २७.गदा २८.तेरडा २९.बाळदमा ३१.माज ३२.सवाशे ३३.तिकडी ३४.भेद ३५.लवकर ३७.वचक ३८.भूत ४०.नड ४१.करवंटी ४३.डाका ४५.सैरावैरा ४९.महाल ५०.वाल ५१.रजनीनाथ ५४.नीरस ५५.कसर ५७.कलाय ५८.खरूज ५९.सरकार ६१.ठाणे ६२.खास ६३.वाम ६४.नाट लावणे ६६.पाऊस ६७.महाराज ६९.कसा ७१.रत ७२.कमळ ७४.दारोदार ७५.नटखट ७७.पारवा ७८.दार ८०.थोर ८१.लीनता ८२.सावकाश

उभे उत्तर

१.साक्षीदार २.गजरा ३.नल ४.मदनबाण ५.रचना ६.नंदीबैल ७.तीर ९.हेर १०.वासकट १३.वाईट १५.दडी १७.मुका १८.सरतेशेवटी १९.वाकडातिकडा २२.अदा २४.कवडी २५.वद २६. रूमाल २७.गरज २९.बाभूळ ३०.रद ३१.माकड ३२.समर ३६.वनराज ३८.मजलदरम जल ३९.तारा ४२.वंदनीय ४४.कामकाज ४५.सैलदर ४६.वैर ४७.सोना ४८.खसखस ५०.वाकस ५२.नीर ५३.थकणे ५६.रकाना ६०.रटरट ६१.ठाणेकर ६२.खासदार ६३.पारा ६५.लाथ ६६.पाळ ६७.मदालसा ६८.हार ६९.कनक ७०.साट ७३.मवाली ७६.खवा ७७.पार ७८.दाता ७९.धोका

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'ॲग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनास भेट



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मध्य भारतातील शेतकऱ्यांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेल्या आणि नागपुरात मागील तीन दिवसांपासून सुरु असलेल्या 'ॲग्रो व्हिजन -२०२५' या कृषी प्रदर्शनीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दुपारी भेट दिली. या भेटीत त्यांनी प्रदर्शनीतील कृषी उत्पादने आणि पूरक उद्योगांच्या दालनांची पाहणी करून शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी 'ॲग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनाच्या कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात या प्रदर्शनाचे प्रणेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त प्रतापराव पवार, ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर तसेच ॲग्रो व्हिजन सल्लागार परिषदेचे चेअरमन डॉ. सी. डी. मायी हे मान्यवर उपस्थित होते. ॲग्रो व्हिजनचे हे आतापर्यंतचे सोळावे प्रदर्शन आहे. याशिवाय फाऊंडेशनला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदर्शनातील विविध संस्था आणि कंपन्यांच्या दालनांना भेट दिली. विशेषतः मुख्यमंत्र्यांनी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.

वृत्तविशेष...

## धर्मेंद्र यांनी २१ वर्षांपूर्वी लढवलेली निवडणूक, या मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराला पराभूत करून झालेले खासदार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले आहे. ८९ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. सिनेसृष्टीत अमूल्य योगदान देणारे धर्मेंद्र यांनी एकेकाळी राजकारणात देखील नशीब आजमावलं होतं. त्यांनी निवडणूक लढवली होती. ही त्यांची पहिली व शेवटची निवडणूक ठरली होती. यानंतर त्यांना राजकारण सोडले.

धर्मेंद्र यांच्या कुटुंबाचा राजकारणातही मोठा इतिहास राहिला आहे. धर्मेंद्र यांनी स्वत: निवडणूक लढवली होती. त्याचबरोबर त्यांच्या दुसऱ्या पत्नी व ज्येष्ठ अभिनेत्री हेमा मालिनी यांची राजकीय कारकीर्द २००३ मध्ये सुरू झाली. तर धर्मेंद्र यांचा थोरला मुलगा सनी देओलने २०१९ मध्ये भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आणि गुरुदासपूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. पण धर्मेंद्र यांच्या राजकीय कारकिर्दीबद्दल तुम्हाला माहिती आहे का?

कोणत्या मतदारसंघाचे खासदार होते धर्मेंद्र?

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत धर्मेंद्र यांनी राजस्थानमधील बिकानेर येथून निवडणूक लढवली होती. महत्त्वाचं म्हणजे ते विजयी झाले होते. त्यांनी काँग्रेस पक्षाच्या रामेश्वर लाल दुडी यांचा पराभव केला. धर्मेंद्र यांनी भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढवून जवळजवळ ६०,००० मतांनी विजय मिळवला होता. संपूर्ण देओल कुटुंबीय आणि हेमा मालिनी यांनी त्यांच्यासाठी प्रचार केला होता. पण धर्मेंद्र यांची राजकीय कारकीर्द फार लहान होती. अवघ्या पाच वर्षांच्या कार्यकाळानंतर त्यांनी राजकारण कायमचे सोडले.

धर्मेंद्र यांनी स्वत: सांगितलं होतं की त्यांना राजकारण आवडत नाही. त्यांना त्यांच्या फिल्मी करिअरवर लक्ष केंद्रित करायचं होतं. राजकारण आपल्यासाठी योग्य नसल्याचं धर्मेंद्र यांनी अनेक मुलाखतींमध्ये सांगितलं होतं. तसेच खासदार असताना बिकानेरच्या लोकांच्या कल्याणासाठी खूप काम केले होते, पण त्याचे श्रेय इतरांनी घेतले होते, असा दावा धर्मेंद्र यांनी केला होता.

## वाळू माफियांना भाजप प्रवेश, आमदार देशमुख संतापले, नेतृत्वाला जाहीर इशारा, जर प्रवेश मागे घेतले नाही तर...

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्यांच्या रांगा लागल्या आहेत. मात्र वाढलेल्या पक्ष प्रवेशांवरून पक्षातच फटाके फुटत आहेत. वाळू माफियाला पक्षात घेतल्याने भाजप आमदार आशिष देशमुख यांनी थेट पक्ष नेतृत्वाशी पंगा घेतला आहे.

काँग्रेसचे पदाधिकारी नरेंद्र पिंपळे, अमित राय, विक्की पाटील, संदीप नारनवरे, सचिन राय, चंद्रकांत शेंडे, रणजीत बागडे, अतुल ढोरे, बॉबी गजभिये यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला खरा पण त्यांच्या पक्षप्रवेशाने स्थानिक नेते दुखावले आहेत.

सावनेरचे भाजप आमदार आशिष देशमुख यांची काँग्रेसमधून भाजपात आलेल्या स्थानिक नेत्यांच्या पक्ष प्रवेशावरून नाराजी व्यक्त केली. वाळू माफियांना पक्षात घेतल्यामुळे आशिष देशमुख यांनी वरिष्ठांवर नाराजी व्यक्त केली. सुनील केदार यांचे कार्यकर्ते नरेंद्र पिंपळे आणि अमित राय यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला. त्यावरून देशमुख कमालीचे नाराज झाले आहेत.

भारतीय जनता पक्षाने आणि नेतृत्वाने संबंधित पदाधिकाऱ्यांचे पक्ष प्रवेश मागे घ्यावेत. पक्ष प्रवेश मागे घेतले नाही तर सत्याग्रहाला बसण्याचा आशिष देशमुख यांनी इशारा दिला आहे. सावनेर येथील नगरपरिषद भाजप उमेदवारांच्या पक्ष कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी आशिष देशमुख यांनी नाराजी व्यक्त करत कार्यालयातून तडकाफडकी बाहेर पडले.

## सुंदरराव मोरे महाविद्यालयामध्ये २९ नोव्हेंबरला रक्तदान शिबिर

**पोलादपूर/प्रतिनिधी :** शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये संस्थापक व महाराष्ट्राचे माजी ग्राम विकास मंत्री कै. प्रभाकर मोरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ. महेश वल्ले यांनी दिली आहे.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरासाठी महाड येथील जनकल्याण रक्तपेढीचे विशेष सहकार्य दरवर्षीप्रमाणे मिळणार आहे.

## कुणीही आचारसंहिता भंगाचे वक्तव्य करता कामा नये; जिंतूरच्या सभेत आधीच्या वक्तव्याची अजित पवारांकडून सारवासारव

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** 'तुम्ही मला मतदान द्या, मी तुम्हाला निधी देईन. तुम्ही काट मारली तर मी पण निधीत काट मारणार' या वक्तव्याचे पडसाद उमटल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सोमवारी (दि.२४) जिंतूर येथे झालेल्या जाहीर सभेत सारवासारव करत तुम्ही आम्हाला मत द्या तुमच्या विकास कामांच्या पाठीशी मी उभा राहील असे वक्तव्य करायला तर हरकत नाही ना ? असा प्रश्न जाहीर सभेत उपस्थित केला. सध्या माध्यमांचे आपल्यावर जास्तच प्रेम आहे. झालेली चूक दुरुस्त करून पुढे जायला हवे. आपल्या भाषेत शब्दांचे कितीही वेगवेगळे अर्थ काढले जातात, तरीही आचारसंहिता भंगाचे वक्तव्य करता कामा नये असेही ते म्हणाले. जिंतूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती साबिया बेगम कफिल फारुकी आणि नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज दुपारी उपमुख्यमंत्री पवार यांची जाहीर सभा झाली. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार राजेश विटेकर, माजी आमदार विजय भांबळे, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार साबिया बेगम फारुकी, सुरेश नागरे आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

सध्या आपल्यावर कॅमेरे लागलेले आहेत. निधीसंबंधी काय बोलतो याकडे सर्वांचे लक्ष आहे. पण आचारसंहितेच्या काळात अधिकाऱ्यांनीही नियमाने वागावे. दबावाखाली काम करू नये असे सांगून पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसला यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवायचा आहे. त्यासाठी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन विकासाचे प्रयत्न केले जातील. आपण शब्दाचा पक्का आहे असे सांगताना पवार यांनी राजेश विटेकर यांना लोकसभा निवडणुकीत थांबायला सांगितल्यानंतर सहा महिन्याच्या आत त्यांना आमदार केले याचा संदर्भ सभेत दिला. निवडणुकीत उमेदवारी देताना सर्व समाज घटकांना प्राधान्य तसेच नव्या जुन्याचा समन्वय राखण्याचे काम केल्याचे ते म्हणाले.

## पडद्यावर झोकात एन्ट्री घेणाऱ्या 'हिमॅन'ची एक्झिट, धर्मेंद्र यांच्यावर घाईत अंत्यसंस्कार का?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रुपेरी पडद्यावर आपल्या दमदार व्यक्तिमत्त्वाने अनेक दशके रुपेरी पडद्यावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे आज निधन झाले. हिंदी चित्रपटसृष्टीतील 'हिमॅन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्मेंद्र यांच्या जाण्याने अवघ्या देशभरातील सिनेप्रेमांमध्ये दु:खाची लाट उसळली. मात्र त्यांच्या निधनाच्या बातमीपासून ते अंत्यसंस्कारापर्यंत कुटुंबीयांनी ठेवलेली गुप्तता आणि पार्थिवावर केलेले घाईने अंत्यसंस्कार यावरून चाहत्यांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

धर्मेंद्र यांच्या पार्थिवावर आज मुंबईतील जुहू येथील स्मशानभूमीत मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थितीत अंतिम संस्कार करण्यात आले. काही जवळचे कलाकार व कुटुंबीयांशिवाय कोणीही अंत्यविधीच्या ठिकाणी उपस्थित नव्हते. चाहत्यांना तर अंत्यदर्शनाची संधीही देण्यात आली नाही. धर्मेंद्र यांच्या निधनाची माहिती अधिकृतपणे कुटुंबीयांकडून देण्यात आली नव्हती. आज सकाळी धर्मेंद्र यांच्या घराबाहेर अचानक रुग्णवाहिका दिसल्याने चाहत्यांच्या मनात धस्स झाले. त्यांना रुग्णालयात दाखल केले जाईल असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, रुग्णवाहिका आणि कुटुंबीयांची वाहने हे जुहू येथील अंत्यसंस्कारासाठी थेट दाखल झाले. त्याच दरम्यान, सूत्रांकडून धर्मेंद्र यांच्या निधनाची माहिती समोर आली. निधनाबाबत अधिकृत घोषणा न झाल्याने अनेक चाहत्यांना ही बातमी सोशल मीडियावरूनच कळली. आपल्या आवडत्या अभिनेत्याला शेवटचे पाहता न आल्याने चाहत्यांनीदेखील हळहळ व्यक्त केली.

निधनाची बातमी जाहीर का केली नाही?

धर्मेंद्र यांच्या निधनाचे वृत्त जाहीर न करण्यामागे काही शक्यता असल्याचे म्हटले जात आहे. काही दिवसांपूर्वी धर्मेंद्र यांची प्रकृती नाजूक असताना, त्यांच्या निधनाचे दावे करणारे वृत्त समोर आले होते. त्यावर देओल कुटुंबाने नाराजी व्यक्त केली होती. धर्मेंद्र यांच्या कुटुंबीयांसाठी त्यांचे निधन हा मोठा धक्का होता. अशावेळी कुटुंबीयांनी खासगी बाब म्हणून निधनाचे वृत्त जाहीर केले नसल्याची शक्यता आहे. धर्मेंद्र यांच्या निधनाच्या वृत्ताने चाहत्यांची गर्दी उसळली असती. त्याचा त्रास सामान्यांना झाला असता. त्यामुळे काही निकटचे नातेवाईक आणि कलाकारांना याची माहिती देण्यात आली.

कोणत्या कलाकारांची उपस्थिती?

धर्मेंद्र यांच्या निधनानंतर त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी सिनेसृष्टीतील महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन, लेखक सलीम जावेद, अभिनेता आमिर खान, सलमान खान, संजय दत्त, अभिषेक बच्चन, अक्षय कुमार आदी कलाकारांनी धर्मेंद्र यांना अखेरचा निरोप दिला.

## अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर घुले बिनविरोध; राधाकृष्ण विखे व बाळासाहेब थोरात यांची मान्यता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) चंद्रशेखर घुले यांची आज, सोमवारी बिनविरोध निवड झाली. बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मंत्री राधाकृष्ण विखे व माजीमंत्री बाळासाहेब थोरात या दोघांच्या संमतीनंतर ही बिनविरोध निवड झाली. बँकेच्या संचालक मंडळाची मुदत येत्या तीन महिन्यात संपणार असल्याने घुले यांची निवड तेवढ्याच कालावधी पुरती असणार आहे. बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक विहित वेळेत होण्यात कोणतीही अडचण नसल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी स्पष्ट केले आहे.



जिल्हा बँकेच्या निवडणूक संचालक मंडळाची निवडणूक थोरात गट व एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र लढवली व वर्चस्व प्रस्थापित केले होते. या गटाकडून चंद्रशेखर घुले निवडून आलेले आहेत. मात्र सुमारे साडेतीन वर्षांपूर्वी झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत थोरात व एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसचे पाच संचालक फुटल्याने चंद्रशेखर घुले यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यावेळी भाजपचे शिवाजी कर्डिले अध्यक्ष झाले होते व बँकेच्या इतिहासात प्रथम भाजपचा अध्यक्ष झाला होता. बँकेचे अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री विखे यांनी लक्ष घातले व बदल घडून आणला होता.

या घडामोडीनंतर राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडून शरद पवार व अजित पवार हे दोन गट स्वतंत्र झाले. चंद्रशेखर घुले अजित पवार गटात, सहभागी पर्यायाने महायुतीत सहभागी झाले. त्यामुळे मूळ थोरात गटाकडून निवडून आलेले घुले यांना तीन महिन्यांच्या कालावधी करता बिनविरोध निवडून देण्यास मंत्री विखे यांचीही संमती होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या घडामोडीत लक्ष घातले मंत्री विखे यांनीही बाळासाहेब थोरात यांच्याशी संपर्क साधला होता. त्यानंतर अध्यक्षपदासाठी चंद्रशेखर घुले यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यांच्या उमेदवारी अर्जावर विखे गटाचे अंबादास पिसाळ व थोरात गटाकडून निवडून आलेले परंतु सध्या अजित पवार गटाकडे असलेले प्रशांत गायकवाड यांनी अनुक्रमे अनुमोदक व सूचक म्हणून स्वाक्षरी केल्या. जिल्हा उपनिबंधक सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली आज निवड सभा झाली. संचालक विवेक कोल्हे वगळता इतर सर्व संचालक उपस्थित होते. कोपरगावमध्ये आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा असल्यामुळे विवेक कोल्हे संचालक मंडळाच्या बैठकीस अनुपस्थित राहिले.

माजी आमदार असलेले चंद्रशेखर घुले गेल्या २५ वर्षांपासून बँकेचे संचालक आहेत. मात्र अध्यक्षपदाची माळ प्रथमच त्यांच्या गळ्यात पडली आहे. चंद्रशेखर घुले यांची ही निवड जिल्ह्यातील व संचालक मंडळातील नात्यागोत्याच्या राजकारणातून झाल्याचीही चर्चा आहे. संचालक मंडळातील बहुसंख्य संचालक त्यांचे नातेवाईक आहेत. गेल्या अध्यक्षपदाची निवडणूक व आज झालेली बिनविरोध निवड यामध्ये काय फरक जाणवतो, असे चंद्रशेखर घुले यांना विचारले असता त्यांनी त्यावेळीची घटना आपल्यासाठी शुभसंकेतच होता, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

कर्जमाफी योजना लागू करण्यास राज्य सरकार अनुकूल आहे, मात्र या वातावरणाचा परिणाम जिल्हा बँकेच्या वसुलीवरही झाला आहे. जिल्हा बँकेपुढे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी संचालक मंडळाचे शिष्टमंडळ घेऊन आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊ, असे मंत्री विखे यांनी निवडीनंतर झालेल्या

## हिंदूंनो किमान दोन मुले जन्माला घाला, तरच हिंदू धर्म टिकेल, अन्यथा भारतातील बहुसंख्या हिंदू संपेलः नरेंद्र महाराज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जगात अनेक ख्रिश्चन आणि मुस्लीम राष्ट्र आहेत. तसेच एक हिंदू राष्ट्र असायला नको का? त्यासाठी देशातील हिंदू समुदायाने जास्तीत जास्त अपत्ये जन्माला घातली पाहिजेत, असे वक्तव्य नाणीज येथील दक्षिण पीठ रामानंदाचार्य नरेंद्र महाराज यांनी केले. हिंदूंची लोकसंख्या कमी होत राहिली तर भारतातील बहुसंख्य हिंदू संपुष्टात येतील, असे त्यांनी म्हटले. ते सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी हिंदू समाजाला किमान दोन अपत्य जन्माला घालण्याचे आवाहन केले.

भारतातील बहुसंख्य हिंदू लवकरच संपणार आहेत. आम्ही दोन आणि आमचं एक, असे हिंदू समाजाचे अपत्याबाबतचे धोरण आहे. मी हिंदू समाजाला आवाहन करतो की, तुम्ही दोन आणि किमान तुमची दोन मुलं असली पाहिजेत. तरच हिंदू धर्म टिकेल. तुम्ही एका अपत्याला जन्म देताय, हे चूक आहे. त्यामुळे हिंदूंची लोकसंख्या झपाट्याने कमी होत आहे आणि मुस्लिमांची संख्या वाढत



आहे. लोकशाहीत व्होटबँकेच्या राजकारणाला महत्त्व असते. या व्होटबँकेमुळे निवडून आलेल्या व्यक्तीला महत्त्व असते. त्यामुळे भारतामध्ये हिंदूंची संख्या वाढली पाहिजे. हिंदूंनी संघटित झाले पाहिजे. तुम्ही देश, देव आणि धर्मासाठी काम केले पाहिजे. आमच्यासारखे धर्मगुरु तुम्हाला पाठिंबा देतील, असे नरेंद्र महाराज यांनी म्हटले.

तसेच आपली संस्कृती आपल्याला कळली नाही म्हणून आपण पुरोगामाच्या नावाखाली धिंगाणा घालतो. अध्यात्मातील विज्ञान आपल्याला कळालेलं नाही म्हणून आपला धिंगाणा सुरु आहे. मी याठिकाणी धिंगाणा हा शब्द जाणीवपूर्वक वापरत आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी मन:शांती देऊ शकत नाही, ती शांती अध्यात्मच देऊ शकते. अध्यात्मात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक दृष्टिकोन आहे, हे पुरोगाम्यांना कळत नाही. पुरोगामीत्वाच्या नावाखाली पाश्चिमात्य संस्कृती स्वीकारण्याचं काम सुरू आहे. ती खरी दुर्बुद्धी आहे. जगात भारत हा एकमेव सक्षम देश आहे, जो संस्कृतीच्या माध्यमातून मन:शांती देऊन शकतो, असेही नरेंद्र महाराजांनी म्हटले.